


दैनिक **अक्षराज**
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३५०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.३१ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# मराठवाड्याला पावसाने झोडपलं, पुढील २ दिवस ३ जिल्ह्यांत मुसळधार बरसणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात सर्वदूर दमदार पाऊस सुरू आहे. गेल्या २४ तासात विभागात १४.५ मिलिमीटर पाऊस झाला आहे. नांदेड, लातूर, हिंगोली जिल्ह्यात पावसाचा जोर आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड जिल्ह्यात दोन दिवस मुसळधार पाऊस होण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे. जायकवाडी धरणाचा पाणीसाठा ७१.४० टक्के झाला आहे.

मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात कमी-अधिक प्रमाणात जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे. या पावसामुळे विभागाला दिलासा मिळाला आहे. गेल्या २४ तासांत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ६.२ मिलिमीटर पाऊस झाला आहे. जालना ५.१, बीड ६.२, लातूर १९.३, धाराशिव ३.४, नांदेड ३५.५, परभणी १४.१ आणि हिंगोली २०.१ मिमी असा जिल्हानिहाय पाऊस झाला आहे. विभागात एकूण १४.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. विभागात आतापर्यंत सरासरी ३१४ मिमी पाऊस होणे अपेक्षित असताना अवघा २५८ मिमी पाऊस झाला आहे. विभागातील पावसाची टक्केवारी ८२.१ आहे. पावसाच्या तुटीमुळे चिंता निर्माण झाली होती. मात्र, दोन दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे. बहुतांश भागात बुधवारी मध्यरात्रीपासून मोठा पाऊस सुरू आहे. नांदेड, हिंगोली जिल्ह्यात नदी-नाल्यांना पूर आला




आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात भीजपाऊस असून सिल्लोड, पैठण, सोयगाव, फुलंब्री तालुक्यात अधिक पाऊस आहे. पावसामुळे पिकांना जीवदान मिळाले असून शेवटच्या टप्प्यातील पेरणी पूर्ण झाली आहे. गेल्या आठवड्यापासून लातूर जिल्ह्यात पिकांना भांड्याने पाणी घालण्यात येत होते. या पावसामुळे पिके तरारली आहेत.

जालना जिल्ह्यात दमदार पाऊस सुरू आहे. जालना शहरात रस्त्यांवर पाणी साचले आहे. छत्रपती शिवाजी म हाराज पुतळा परिसरात पावसाचे पाणी साचले होते. तर एसबीआय स्कूलसम ोर गटारीचे पाणी वाहत असल्यामुळे पादचारी, वाहनचालकांची गैरसोय झाली. मुर्गी बेस रोड परिसरात पाणी तुंबले होते. कन्नड तालुक्यात जुलैअखेर सरासरीच्या ९२ टक्के पाऊस झाला आहे. तालुक्यात दमदार पाऊस नसल्याने नदी-नाले कोरडे आहेत. खुलताबाद तालुक्यात तीन दिवसांपासून पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुसळधार पावसाच्या सरी दिवसभर कोसळत होत्या. काही गावात विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शाळांना सुट्टी देण्यात आली. बीड जिल्ह्यात दिवसभर संततधार पाऊस सुरू होता.

**नांदेड जिल्ह्यात मुसळधार !**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी गुरुवारी दुपारी जारी केलेल्या हवामान सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दुपारी चारपर्यंत 'रेड अलर्ट' घोषित करण्यात आला होता. जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार पाऊस झाला आहे. संबंधित यंत्रणांनी आवश्यक खबरदारी घेण्याची सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केली. जिल्ह्यातील कमी उंचीच्या पुलांवर दीड ते दोन फूट उंचीने पाणी वाहत असल्याने पुलांवरून पायी किंवा वाहनाने जाण्याचे धाडस करू नये. तसेच नदीकाठावरील पर्यटनस्थळांवर निश्चित सुरक्षित मर्यादेपलीकडे जाऊ नये, अशी सूचनाही करण्यात आली आहे

# टाकळी ढोकेश्वर येथिल महात्मा फुले चौकात पिकअप पलटी !

## एक युवक ठार, सहाजण गंभीर जखमी !

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील महात्मा फुले चौकातील धोकादायक वळणावर बुधवारी (दि.२९ जुलै) रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास एका भीषण अपघात घडला. सिन्नर येथून महावितरणचे विद्युत साहित्य घेऊन बार्शीला निघालेली पिकअप गाडी (क्र. एमएच १५ जेडब्ल्यू २८०४) अचानक पलटी झाली. या अपघातात एका युवकाचा मृत्यू झाला, तर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत.

अहिल्यानगर- कल्याण महाम ार्गावरील टाकळी ढोकेश्वर येथिल महात्मा फुले चौकातील धोकादायक असलेल्या वळणावर गाडीचा ताबा सुटून पलटी झाला. अपघात इतका गंभीर होता की वाहनातील अनेक जण जखमी झाले. अपघात घडल्यानंतर जवळील नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक ग्रामस्थांनी व पोलिस मित्र अनिलशेठ नागरे यांनी तातडीने मदतकार्य करत जखमींना बाहेर कढत तातडीने पोलीस व रुग्णवाहिकेला माहिती दिली. जखम ींना उपचारासाठी टाकळी ढोकेश्वर येथिल ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यास मदत केली. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या.

या अपघातात तुषार भगवान भोसले (वय ३०, रा. दुबेर, ता. सिन्नर, जि. नाशिक) यांचा मृत्यू झाला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. अपघातात सुनील रामदास बोडके (रा. नाशिक), रवी कैलास शिंदे (रा. शिंदेगाव, जि. नाशिक), रविराज पाटील (रा.




कर्नाटक), सोनू इंद्रबहादुर सिंग (रा. उत्तर प्रदेश), राम गंगाराम रच्छा (रा. उत्तर प्रदेश) आणि कांतीलाल प्रभाकर गांगुर्डे (रा. पंचकेश्वर, ता. निफाड, जि. नाशिक) हे जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघाताचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ही दुर्घटना घडली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पोपट रोकडे पुढील तपास करीत आहेत.

# एमडी ड्रग्जसह सराईत आरोपीला अटक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** शहरात अमली पदार्थाच्या अवैध व्यापाराविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) म ोठी कारवाई करत एमडी (मेफेड्रोन) ड्रग्जची विक्री करणाऱ्या सराईत आरोपीला अटक केली आहे. रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील या धडक कारवाईत पोलिसांनी १८.९५ ग्रॅम एमडी ड्रग्ज व एक महागडा मोबाईल असा एकूण १,४४, ७५० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परवा रात्री स्थानिक गुन्हा शाखेचे पथक रामनगर परिसरात गस्त घालत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली कि, ललित उर्फ आर्यन बादल कंजर (३८) रा. कंजर मोहल्ला, जलनगर वार्ड, चंद्रपूर हा आपल्या जुन्या घरात विक्रीसाठी एमडी ड्रग्जचा साठा करुन ठेवत आहे. माहितीची खातरजमा झाल्यानंतर छायाचित्रकारासह आरोपीच्या घरावर छापा टाकण्यात आला. झडतीदरम्यान पोलिसांना १८.९५ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) ड्रग्ज जप्त करण्यात आले.

# लासलगावमध्ये चोरट्यांचा थरार! भररस्त्यात कारची काच फोडून ७० हजार लांबवले

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३०, लासलगाव (नाशिक) :** लासलगाव शहर व परिसरात चोरीच्या घटनांनी अक्षरशः कळस गाठला असून चोरट्यांनी पोलिसांनाच उघड आव्हान दिल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. लासलगाव पोलीस ठाण्याच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ भररस्त्यात उभ्या असलेल्या वॅगन-आर कारची मागील काच फोडून अज्ञात भामट्याने तब्बल ७० हजार रुपयांची रोख रक्कम लांबवल्याची खळबळजनक घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भरवस फाटा येथील एक शेतकरी लासलगाव येथे किराणा माल खरेदी करण्यासाठी आले होते. त्यांनी आपली वॅगन-आर कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यांसमोरील दुकानाजवळ पार्किंगमध्ये उभी केली होती. ते दुकानात गेले असतानाच ही संधी साधून अज्ञात चोरट्याने गाडीची मागील काच फोडली आणि आत ठेवलेली ७० हजार



रुपयांची रोकड घेऊन पळ काढला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

सहा महिन्यांत अनेक मंदिरे, दुकाने अन् व्यापारी टार्गेट!

गेल्या सहा महिन्यांत लासलगावमधील जवळजवळ सर्व प्रमुख मंदिरांमध्ये चोरीच्या घटना घडल्या आहेत. याशिवाय कांदा व्यापाऱ्यांची कार्यालये आणि मोठी दुकानेही चोरट्यांच्या निशाण्यावर आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात चोऱ्या होऊनही अद्याप एकाही चोरीच्या घटनेचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आलेले नाही. त्यामुळे लासलगावच्या नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी व भीतीचे वातावरण पसरले आहे.

**पोलिसांसमोर मोठे आव्हान..**

पोलीस ठाण्यापासून अगदी जवळच एवढा मोठा दरोडा पडल्याने पोलिसांच्या गस्तीवर आणि सुरक्षा व्यवस्थेवर मोठा प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. चोरटे उघडपणे पोलिसांना आव्हान देत असतानाच स्थानिक प्रशासन मात्र हतबल दिसत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

**नागरिकांची मागणी :**

शहर आणि परिसरात गुन्हेगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. पोलीस प्रशासनाने या वाढत्या चोऱ्यांची गंभीर दखल घेऊन या घटनेतील चोरट्यांचा तात्काळ शोध घ्यावा आणि लासलगावमध्ये रात्रीची गस्त वाढवून सुरक्षेची ठोस उपाययोजना करावी.

# आषाढी यात्रेत श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास ८ कोटी ९२ लाखांचे उत्पन्न

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.३०, पंढरपूर :** यंदाच्या आषाढी यात्रा कालावधीत वारकरी भाविकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी उदंड श्रद्धेने दान अर्पण केले असून, मंदिर समितीला विविध माध्यमांतून एकूण ८ कोटी ९२ लाख ७२ हजार ४७८ रुपये इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे. तसेच सोन्या-चांदीचे दागिने, रोख देणग्या आणि विविध सेवा शुल्कांमधूनही मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळाल्याची माहिती मंदिर समितीचे सहाध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. आषाढ शुद्ध १ (१५ जुलै) ते आषाढ शुद्ध १५ (२९ जुलै) या कालावधीत दर्शनरांगेत मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी झाली होती. भाविकांना सुलभ आणि जलद दर्शन मिळावे यासाठी मंदिर समितीने आवश्यक सुविधा आणि नियोजन केले

**१० लाखांहून अधिक भाविकांचे दर्शन !**

आषाढी यात्रा कालावधीत ४ लाख ९५ हजार २२ भाविकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे पदस्पर्श दर्शन, तर ५ लाख ४२ हजार भाविकांनी मुखदर्शन घेतले. अशा प्रकारे सुमारे १० लाख ३७ हजारांहून अधिक भाविकांनी आषाढी यात्रेत श्री विठ्ठलाचे दर्शन घेतल्याची नोंद मंदिर समितीने केली आहे.

होते. यात्रेदरम्यान श्रींच्या चरणाजवळ ७१ लाख ४४ हजार ७८ रुपये, देणगी स्वरूपात २ कोटी ९३ लाख ९७ हजार ७६ रुपये, लाडू प्रसाद विक्रीतून ८३ लाख ४७ हजार रुपये, भक्तनिवासातून ४६ लाख ३१ हजार १०३ रुपये, हुंडीपेटीतून २ कोटी ४० लाख ३२ हजार ४०२ रुपये, परिवार देवतांमार्फत १५ लाख २७ हजार ४४३ रुपये, सोने-चांदी अर्पणातून ९६ लाख ७२ हजार ९३७ रुपये, तर अगरबत्ती, चंदन, महावस्त्रे, फोटो, मोबाईल लॉकर आदी माध्यमांतून ४५ लाख २० हजार ४३९ रुपये इतके उत्पन्न प्राप्त झाले. मागील वर्षीच्या आषाढी यात्रेत मंदिर समितीला १० कोटी ८४ लाख ८ हजार ५३१ रुपये उत्पन्न मिळाले होते. यावर्षीचे उत्पन्न ८ कोटी ९२ लाख ७२ हजार ४७८ रुपये असून, गेल्या वर्षाच्या तुलनेत १ कोटी ९१ लाख ३६ हजार ५३ रुपयांची घट नोंदविण्यात आली आहे. मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी सांगितले की, भाविकांकडून प्राप्त होणाऱ्या दानाचा उपयोग श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी करण्यात येणार आहे.

# बोंद्रीच्या चिखलात फुलला प्रशासनाचा माणुसकीचा अंकुर



**अक्षराज: सुरेश संकपाळ**

**दि.३०, पाटण :** कोयनेच्या पाण्याने धरण भरतंय, बळीराजाच्या घामाने शिवार फुलतंय ; त्याच शिवारात प्रांताधिकारी-तहसीलदारांनी बैलजोडी हाकली आणि चिखल केला शेतकऱ्यांच्या बरोबर रोप लावली. पाटण तालुका म्हणजे भाताचे कोठार. आणि यंदा या कोठारावर वरुणराजाची विशेष कृपा झाली आहे. पाटण तालुक्यात दमदार पाऊस पडत आहे. तालुक्यातील छोटी धरणे ओव्हरफ्लो झाली आहेत, तर महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी असलेले कोयना धरण झपाट्याने भरत आहे. नाले-ओढे तुडुंब झाले आहेत, संपूर्ण शेतशिवार हिरव्या शालूने नटले आहे. अशा पोषक वातावरणात बळीराजा सुखावला आहे आणि त्याच्या चेहऱ्यावर समाधानाचं हास्य फुललं आहे.

आम्ही अधिकारी असलो तरी शेती आमच्या रक्तात आहे. शेती विषयक कोणतीही अडचण आली तर थेट संपर्क साधा. प्रांताधिकारी सोपान टोप्पे व तहसीलदार अनंत गुरव यांचे शेतकऱ्यांना भावनिक आवाहन केले आहे.

याच आनंददायी वातावरणात बोंद्री गावामध्ये एक आगळा-वेगळा आणि डोळ्याचं पारणं फेडणारा रोप लावणीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. नेहमी शासकीय कार्यालयात, फाईल्समध्ये व्यस्त असणारे पाटणचे प्रांताधिकारी. सोपान टोप्पे, आणि तहसीलदार अनंत गुरव यांनी आपलं ऑफिस सोडून थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाणं पसंत केलं. त्यांनी फक्त भेट दिली नाही, तर शेतकऱ्यांच्या व्यथा थेट बांधावर बसून जाणून घेतल्या.

रिमझिम पाऊस अंगावर झेलत दोन्ही अधिकाऱ्यांनी शेतात प्रवेश केला. शेतकऱ्यांच्या हातातील बैलजोडीचा कासरा स्वतःच्या हातात घेतला आणि बळीराजाचा खरा साथीदार असलेल्या बैलांच्या सहाय्याने शेतात चिखल केला. एवढ्यावरच न थांबता, त्यांनी शेतमजूर महिलांसोबत चिखलात बसून भाताचे तरू उपटले आणि गुडघाभर चिखलात उभे राहून शेतकऱ्यांसोबत भातलागण केली. पाऊस पडत असताना सुरू असलेल्या या लावणीने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दुहेरी समाधान आणले.


यावेळी बोलताना प्रांताधिकारी सोपान टोप्पे म्हणाले, आम्ही अधिकारी असलो तरी शेती करायची आम्हाला मनापासून आवड आहे. आम्हीही मूळ शेतकरीच आहोत. या मातीशी आमचं नातं आहे.

तहसीलदार अनंत गुरव यांनी शेतकऱ्यांना भावनिक साद घातली, *तुम्हाला शेती विषयक कोणतीही अडचण आली - सातबारा असो, पीक विमा असो, ई-पीक पाहणी असो - थेट आमच्याशी संपर्क साधा. आम्ही तुमच्या सेवेसाठी आहोत. घाबरू नका, आमचं दार तुमच्यासाठी नेहमी उघडं आहे. यावेळी ग्राम महसूल अधिकारी शितल जाधव यांच्यासह बोंद्री गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या पार्श्वभूमीवर राबवण्यात आलेला हा उपक्रम फक्त रोप लावणी नव्हता, तर प्रशासन आणि शेतकरी यांच्यातील विश्वासाच्या रोपाची लावणी होती, असा आदर्श या कार्यक्रमाने घालून दिला आहे.

अक्षराज



संपादकीय



## वाईट कर्माचे फळ वाईटच मिळते तरीही...

सर्वांना चांगले माहीत आहे की चांगले कर्म केल्यास त्याचे फळ चांगले मिळते .आणि वाईट कर्माचे फळ हे वाईटच मिळते.तरीही आजकाल बरेच लोक वाईट कर्म करतात आणि वाईट कर्माचे वाईट फळ मिळाल्यावर मात्र रडतात, कुढतात आणि नंतर पश्चात्ताप करत बसतात.आपण नेहमी पाहतो की चांगले लोक सतत चांगले कर्म करतात. आपल्या कर्मामुळे कोणाचे वाईट होणार नाही,कोणाचेही नुकसान होणार नाही, कोणाचे मन दुखावले जाणार नाही याची कटाक्षाने काळजी घेतात.चांगले लोक कोणावरही दया करतात,मोठ्या मनाने परोपकार करतात आणि गरजू लोकांना आर्थिक मदत करतात.चांगल्या लोकांचा स्वभाव,वागणे,बोलणे आणि व्यवहार नेहमी बावनकशी सोन्यासारखे असतात.वाईट लोक मात्र स्वतः मनमानी जीवन जगतात.नेहमी वाईट कृत्ये करतात,वाईट वागून व वाईट बोलून इतरांना मानसिक व शारीरिक त्रास देतात.वाईट कर्म केले तरीही त्यांना त्याचे काहीच वाटत नाही.त्यांच्या वाईट कर्मांचा पाढा कधीच संपत नाही. वाईट संगतीमुळे वाया गेलेले बहुतांश तरुण मुले दररोज बिनधास्तपणे व्यसने करतात.नेहमी गुटखा,तंबाखू चघळतात व सार्वजनिक ठिकाणी थुंकतात. कोठेही थांबून सिगारेट ओढतात.सिगारेटचा विषारी धूर हवेत सोडतात.यामुळे सध्या सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक आणि कौटुंबिक स्वास्थ्य पार बिघडून गेले आहे .व्यसने केल्यास लवकर मरण येते हे चांगले माहीत असूनही व्यसनी लोक व्यसन सोडायला तयार नसतात.दररोज दारु पिल्यावर संसाराचे वाटोळे होते, लेकराबाळांची हेळसांड होते,शरीराचे खूप नुकसान होते हे माहीत असले तरीही दारु पिणारे लोक दारु पिणे सोडत नाहीत.एकेदिवशी त्यांच्या मरणाची खबर येते पण दारुचे व्यसन ते सोडून देत नाहीत.कोणतेही वाहन सुसाट वेगाने चालविल्यास आणि दारू पिऊन अनियंत्रित वेगाने वाहने पळविल्यास अपघात होतो हे माहीत असूनही आजचे तरुण व हेकाडी माणसे चुकीच्या पद्धतीने वाहने चालवतात. भ्रष्टाचार केल्यावर, अफरातफर केल्यास, लाच घेतल्यावर, दुसऱ्यांना फसवल्यावर आणि वाईट मार्गाने अमाप संपत्ती जमा केल्यावर लोक तोंडावर गोड बोलतात पण तेच लोक पाठीमागे गेल्यावर वाट्टेल ती नावे ठेवतात.भ्रष्टाचाराचा पैसा पचेलच याची खात्री नसते.भ्रष्टाचार उघडा पडल्यावर दंडात्मक कारवाई होते,निलंबन होते,सम ाजात छी तू होते, कारागृहात रवानगी होते.हे सगळे खात्रीने माहीत असूनही भ्रष्टाचार करणारे लोक निर्ढावलेले असतात. भ्रष्टाचारात आकंठ बुडालेले असतात. कोणत्याही सम ाजात व्याभिचाराला थारा नाही.पण व्याभिचार समाजाला व संस्कृतीला लागलेली भयंकर किड आहे.विवाहित असुनही काही पुरुष व काही स्त्रिया व्याभिचार करताना दिसतात.हेच लोक व्याभिचार करतात आणि स्वतः फार नेक असल्याचा ढोंगीपणा करतात.व्याभिचार केल्याने निंदानालस्ती होते,समाजात बदनामी होते,नातेवाईक सगळे व्यवहार बंद करून टाकतात.याची पुरेपूर जाणीव असली तरीही आज रोजी व्याभिचार करणाऱ्यांची संख्या फार वाढली आहे. लाजीरवाणी बाब अशी की हेच लोक स्वतः चारित्र्यवान असल्याचे भासवतात .काही नोकरदार प्रामाणिकपणे नोकरी करत नाहीत.कामचुकारपणा त्यांच्या ठायी भिनलेला असतो.नोकरीला वेळेवर न जाणे,नोकरी प्रामाणिकपणे न करणे,टंगळमंगळ करून वेळ मारून नेणे आणि आपला पगार घट्ट करणे हे त्यांचे आवडते लक्षण असते.जर नोकरदारांनी नोकरीत सतत कामचुकारपणा केला तर बदनामी होते, लोक वाट्टेल ती नावे ठेवतात.असे काम चुकार नोकरदार कदाचित निलंबित होण्याची जास्त शक्यता असते.हे खात्रीने माहीत असले तरीही काही नोकरदार मात्र आपली नोकरी कधीच प्रामाणिकपणे करत नाहीत.उलट आपणच फार कर्तृत्ववान आहोत असे दाखवतात.वाईट माणसे नेहमी वाईट वागतात, वाईट बोलतात,फसवणूक करतात, मनमानी जीवन जगतात.सार्वजनिक ठिकाणी चुकीचे कृत्ये करतात.श्रीमंत होण्यासाठी,पैसा कमावण्यासाठी आणि स्वतःचा मोठेपणा मिरवण्यासाठी माणसे कोणत्याही थराला जाण्यास तयार असतात.असे केल्याने आर्थिक फायदा होतो की तोटा होतो याची खात्री नाही.तरीही काही लोक त्यांचा वाईटपणा सोडून द्यायला तयार नाहीत. जीवनात नाव कम वायचे असेल,चांगला व्यक्ती म्हणून कायमचा निरोप घ्यायचा असेल आणि स्वतःच्या अंत्यविधीला खूप मोठा मित्र परिवार यावा असे वाटत असेल तर आत्ताच्या आत्ता स्वतःमध्ये लपलेल्या दुर्गुणांना नष्ट करा.पृथ्वीवरील

प्रत्येक व्यक्तीमध्ये एक दुष्ट रावण दडून बसलेला असतो.अगोदर त्याचा नायनाट करा.वाईट कर्माचे फळ वाईटच मिळते हे सदैव ध्यानात ठेवा.आणि आत्तापासून चांगले वागायला सुरुवात करा.

**- बबन दामोदर गुळवे**

# व्यक्ती नव्हे, व्यवस्था जागी झाली पाहिजे!

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाच्या (ऋॠअ) कारवायांविषयी सातत्याने वृत्तपत्रांमध्ये बातम्या वाचत आहे. राज्यभर अन्नभेसळीविरोधात धाडी, परवान्यांचे निलंबन, अन्न नमुन्यांची तपासणी, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर कठोर कारवाई आणि नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या प्रवृत्तींवर निर्भय अंम लबजावणी होत असल्याचे दिसत आहे. ही दृश्ये प्रत्येक जबाबदार नागरिकासाठी आश्वासक आहेत. कारण सुरक्षित अन्न हा कोणाचाही उपकार नसून प्रत्येक भारतीय नागरिकाचा घटनात्मक आणि मानवी अधिकार आहे.

या बातम्या वाचताना माझ्या मनात एक प्रश्न वारंवार निर्माण होतो. हा प्रश्न कोणत्याही व्यक्तीविरुद्ध नाही, कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याच्या प्रामाणिकतेवर शंका घेण्यासाठी नाही आणि कोणालाही दोषी ठरविण्यासाठी तर अजिबात नाही. हा प्रश्न भारतीय राज्यघटनेने निर्माण केलेल्या प्रशासकीय व्यवस्थेबद्दल आहे. कारण लोकशाहीम ध्ये व्यक्ती येतात आणि जातात; परंतु व्यवस्था कायम राहते. नागरिकांचा विश्वास हा व्यक्तींवर नसून व्यवस्थेवर असला पाहिजे.

आपल्या भारतीय राज्यघटनेने विधिमंडळाला कायदे करण्याचे अधिकार दिले. त्या कायद्यांची प्रामाणिक अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कार्यपालिकेला दिली. त्या जबाबदारीसाठी सार्वजनिक सेवकांची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या पगारासाठी लागणारा प्रत्येक रुपया हा साम ान्य नागरिक भरत असलेल्या करातून येतो. म्हणजेच प्रत्येक सार्वजनिक सेवकाची सर्वोच्च निष्ठा ही कोणत्याही व्यक्तीशी, पक्षाशी किंवा सरकारशी नसून भारतीय राज्यघटनेशी आणि भारतीय नागरिकांशी असली पाहिजे. हीच आपल्या संविधानाची ताकद आहे.

आज ज्या कायद्यांच्या आधारे कारवाया होत आहेत, ते कायदे आज तयार झालेले नाहीत. अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहे. तपासणी करण्याचे अधिकार, नमुने गोळा करण्याचे अधिकार, परवाने निलंबित करण्याचे अधिकार आणि दोषींवर कारवाई करण्याचे अधिकार प्रशासनाकडे पूर्वीपासूनच होते. त्यामुळे एक जागरूक नागरिक म्हणून माझ्या मनात स्वाभाविक प्रश्न निम ाण होतो – जर कायदे तेच होते, अधिकार तेच होते आणि यंत्रणाही तीच होती, तर आज दिसणारी अंमलबजावणी यापूर्वी सातत्याने का दिसली नाही?

श्री. तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर अन्न सुरक्षा नियमांच्या अंमलबजावणीत अधिक वेग आणि दृश्यमानता आल्याचे अनेक वृत्तांतांम धून दिसते. हे निश्चितच स्वागतार्ह आहे. परंतु या उदाहरणाकडे केवळ एका अधिकाऱ्याच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीने पाहणे पुरेसे नाही. उलट हा प्रसंग आपल्याला अधिक मोठा प्रश्न विचारण्यास भाग पाडतोजर एका अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली अल्पावधीत इतका बदल घडू शकतो, तर अशी कार्यक्षमता प्रत्येक कार्यालयात, प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक काळात का दिसू नये?

काही वृत्तांमध्ये कर्मचाऱ्यांकडून कामाचा ताण वाढल्याच्या भावना व्यक्त झाल्याचेही वाचायला मिळाले. त्या भावना वास्तव असू शकतात. अधिक तपासण्या, अधिक दस्तऐवजीकरण, अधिक जबाबदारी आणि प्रलंबित कामे निकाली काढण्याचे प्रयत्न यामुळे कामाचा भार वाढू शकतो. परंतु नागरिक म्हणून मला पडणारा प्रश्न वेगळा आहे. जर हेच काम कायद्याने पूर्वीपासून अपेक्षित होते, तर त्याची सातत्यपूर्ण अंमलबजावणी प्रत्येक काळात समान दर्जाने का झाली नाही? हा प्रश्न एखाद्या कर्मचाऱ्याच्या विरोधात नसून, व्यवस्थेच्या सातत्याबद्दल आहे.

लोकशाहीमध्ये एखाद्या अधिकाऱ्याचे कौतुक करणे आवश्यक आहे; पण त्याहून अधिक आवश्यक आहे अशी व्यवस्था निर्माण करणे की जिथे चांगले प्रशासन हे एखाद्या व्यक्तीच्या इच्छाशक्तीवर अवलंबून राहत नाही. कारण जर प्रत्येक वेळी नवीन अधिकारी आल्यावरच नागरिकांना आता खरे काम सुरू झाले असे वाटत असेल, तर तो एका व्यक्तीचा विजय असला तरी व्यवस्थेसाठी तो आत्मपरीक्षणाचा विषय आहे.

आजचा प्रश्न ऋॠअ पुरता मर्यादित नाही. हा प्रश्न प्रत्येक शासकीय विभागाला लागू होतो. महसूल असो, पोलीस असोत, आरोग्य विभाग असो, शिक्षण असो, पर्यावरण असो किंवा स्थानिक स्वराज्य संस्थाप्रत्येक ठिकाणी नागरिकांना व्यक्तीनिष्ठ नव्हे, तर व्यवस्थेनिष्ठ प्रशासन मिळाले पाहिजे. कायद्याची अंमलबजावणी अधिकाऱ्यानुसार बदलू लागली, तर नागरिकांचा विश्वास व्यवस्थेवरून व्यक्तीकडे सरकतो. लोकशाहीसाठी ही निरोगी स्थिती नाही.

भारतीय राज्यघटना आपल्याला केवळ म तदानाचा अधिकार देत नाही; ती आपल्याला प्रश्न विचारण्याचा अधिकारही देते. सार्वजनिक पैशातून चालणाऱ्या प्रत्येक संस्थेला उत्तरदायी ठेवण्याची जबाबदारीही नागरिकांवरच आहे. प्रश्न विचारणे म्हणजे शासनविरोधी भूमिका नव्हे; उलट लोकशाही मजबूत करण्याचा तो सर्वात प्रभावी मार्ग आहे. जेथे प्रश्न विचारले जातात, तेथे सुधारणा घडतात. जेथे सुधारणा घडतात, तेथे जनतेचा विश्वास वाढतो. आणि जेथे विश्वास वाढतो, तेथे लोकशाही अधिक सक्षम होते.

आज मला कोणत्याही व्यक्तीचा गौरव किंवा टीका करायची नाही. मला एका मोठ्या राष्ट्रीय विचाराला चालना द्यायची आहे. आपण व्यक्तिपूजा करणार आहोत की व्यवस्थेला सक्षम बनविणार आहोत? प्रत्येक नवीन अधिकारी आल्यावर पुन्हा नव्याने आशा निर्माण होण्याची वेळ का यावी? प्रत्येक नागरिकाला प्रत्येक दिवशी, प्रत्येक कार्यालयात, प्रत्येक अधिकाऱ्याकडून समान दर्जाची सेवा मिळणे हा त्याचा घटनात्मक अधिकार नाही का?

म्हणूनच, एक नागरिक म्हणून माझे आवाहन आहे की आपण व्यक्तींच्या यशाचे स्वागत करूया; परंतु त्याच वेळी अशी मागणी करूया की प्रत्येक शासकीय विभागात कार्यक्षमतेचे मोजमाप सार्वजनिक व्हावे, नियमित कामगिरी लेखापरीक्षण (झशअॅषेऑरपलश ओंवळीं) व्हावे, तपासण्यांची माहिती पारदर्शक पद्धतीने नागरिकांसमोर यावी आणि कायद्याची अंमलबजावणी ही व्यक्तीवर नव्हे तर व्यवस्थेच्या संस्कृतीवर आधारित असावी.

शिक्षित होऊया – म्हणजे आपल्या घटनात्मक अधिकारांची जाणीव ठेवूया.

जागृत होऊया – म्हणजे उत्तरदायित्वाचे प्रश्न निर्भयपणे विचारूया.

संघटित होऊया – म्हणजे सक्षम, पारदर्शक आणि संविधाननिष्ठ प्रशासनाची सामूहिक मागणी करूया.

कारण शेवटी प्रश्न तुकाराम मुंढे यांचा नाही.

प्रश्न असा आहे की भारतीय राज्यघटनेने नागरिकांच्या कल्याणासाठी निर्माण केलेली व्यवस्था प्रत्येक दिवशी, प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्येक अधिकाऱ्याच्या काळात तितक्याच प्रामाणिकपणे कार्य करेल का?

हा प्रश्न माझा नाही.
हा प्रश्न प्रत्येक भारतीय नागरिकाचा आहे.

**– विजयकुमार कट्टी**
**एक जागरूक नागरिक**

# न फनकार तुझसा, तेरे बाद आया, मोहम्मद रफी तू बहोत याद आया

आज ३१ जुलै, चार दशकांहून अधिक काळ आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे महान गायक, सूरसम्राट म ोहम्मद रफी यांचा स्मृती दिन. मोहम्मद रफी यांचा जन्म २४ डिसेंबर १९२४ ला पंजाब राज्यातील कोटला सुल्तानसिंह या गावात झाला. मोहम्मद रफी यांना लहानपणापासूनच गायनाची आवड होती. मोहम्मद रफी १४ वर्षाचे असताना त्यांचे कुटुंब लाहोरला स्थलांतरित झाले. तिथेच त्यांनी शास्त्रीय संगीतातील दिग्गज गायक उस्ताद बडे गुलाम अली, उस्ताद अब्दुल खान, पंडित जीवनलाल मट्टू आणि फिरोज निजामी या महान शास्त्रीय गायकांकडे संगीताचे धडे गिरवले. पंजाबी चित्रपट गुल बलोच पासून त्यांनी चित्रपट गायनाला सुरवात केली. या चित्रपटातील त्यांच्या आवाजातील गाणी लोकप्रिय झाली. त्यांच्या आवाजाने प्रभावित होऊन फिरोज निजामी यांनी त्यांना लाहोर रेडिओला नोकरीला लावले.

ते रेडिओवर गाणी म्हणू लागली. रेडिओवरील त्यांची गाणी ऐकून जे. बी. वाडिया यांनी त्यांना आपल्या बाजार या चित्रपटासाठी पार्श्वगायन करण्याची विनंती केली ती मोहम्मद रफी यांनी म ान्य केली. या चित्रपटातील सातही गाणी मोहम्मद रफी यांनीच गायली. ती सर्व गाणी लोकप्रिय झाली. त्याकाळातील लोकप्रिय संगीतकार नौशाद यांनी त्यांना अनेक चित्रपटात संधी दिल्या. पुढे या जोडीने हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवले. संगीतकार नौशाद आणि गायक मोहम्मद रफी म्हणजे चित्रपट सुपरहिट असे समीकरणच बनले.

मोहमद रफी यांच्या आवाजाने नौशाद यांच्यावर अक्षरशः मोहिनी घातली होती. ५० च्या दशकात नौशाद रफी साहेबांव्यतिरिक्त कोणत्याही गायकासोबत काम करत नव्हते. या दोघांनी लोकप्रिय संगीताचा वापर करून चित्रपट सृष्टीतील गीतांचे आयामच बदलून टाकले. बैजू बावरा, उडण खटोला, कोहिनूर, मेरे मेहबूब, दिल लिया दर्द दिया, संघर्ष या लोकप्रिय झालेल्या चित्रपटांचे संगीतकार नौशाद आणि गायक मोहम्मद रफी ही जोडी प्रसिद्ध होती. ओ.पी. नय्यर, सचिन देव बर्मन, शंकर जयकिशन, मदन मोहन, रोशन या संगीतकारांचेही मोहम्मद रफी हे आवडते गायक होते. या संगीतकरांनी दिलेले संगीत आणि



मोहम्मद रफी यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. १९५० ते १९८० असा सुमारे ४ दशकांचा काळ मोहम्मद रफी यांनी अक्षरशः गाजवला.

गुरुदत्त, दिलीपकुमार, राजकपूर, देवानंद, शम्मी कपूर, शशी कपूर, राजेंद्र कुमार, सुनील दत्त, राजकुमार, राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, जितेंद्र, विनोद खन्ना, ऋषी कपूर अशा सर्व नायकांना त्यांनी आवाज दिला. या सर्व नायकांना महानायक करण्याचे काम मोहम्मद रफी यांच्या आवाजाने केले. मोहम्मद रफी यांच्या आवाजाने तरुणाईला वेड लावले होते. त्यांची सर्व गाणी इतकी लोकप्रिय झाली की ती आजही गायली जातात, ऐकली जातात. मोहम्मद रफी यांनी सर्व प्रकारची गाणी गायली. केवळ हिंदीतच नाही तर उर्दू, पंजाबी, मराठी, तेलगू या भाषांमध्येही त्यांनी गाणी गायली.

त्यांची गाणी केवळ भारतातच नव्हे तर जगभर लोकप्रिय झाली. मोहम्मद रफी यांना गायनासाठी सहा वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. भारत सरकारनेही पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. भारत सरकारने त्यांच्या स्म रणार्थ त्यांच्या नावाचा स्टॅम्पही तयार केला आहे. ३१ जुलै १९८० ला रात्री १० वाजून ५० मिनिटांनी मोहम्मद रफी यांनी जगाचा निरोप घेतला. मोहम्मद रफी यांच्या अंत्ययात्रेत दहा हजारांहून अधिक चाहते उपस्थित होते. २०१३ मध्ये भारतीय हिंदी सिनेमाला १०० वर्ष पूर्ण झाली त्यानिमित्ताने बिबीसी एशिया नेटवर्कने एक सर्व्हे केला. त्यात मोहम्मद रफी हेच हिंदी चित्रपट सृष्टीतील महान गायक म्हणून नावाजले गेले. मोहम्मद रफी हे केवळ गायक म्हणूनच नाही तर व्यक्ती म्हणूनही महान होते. मोहम्मद रफी नेहमीच दुसऱ्यांना मदत करण्यात पुढे असत. त्यांनी काही संगीतकारांसाठी फुकट गाणीही गायली आहेत. रॉयल्टी साठी त्यांनी कधी कोणाला अडवले नाही. त्यांच्या विषयी लता मंगेशकर म्हणतात, मधुर स्वभावाचा सुरीला माणूस. माझे भाग्य आहे की माझी बहुतेक गाणी मी त्यांच्यासोबत गायली आहेत. संगीत न समजणाऱ्या लोकानांही त्यांनी कानसेन बनवले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या सन्मानार्थ आनंद बक्षी यांनी लिहिले होते की, न फनकार तुझसा, तेरे बाद आया, मोहम्मद रफी तू बहोत याद आया.....

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## शुध्द हेतू

आंदोलना महत्वाचा
आवश्यक हेतु शुध्द
एकत्र अस्वस्थशक्ती
आस्थापनां विरूध्द

तयारी अत्यंत जरुरी
छोटेसे आंतरिकयुध्द
अस्मितेलागता स्पर्श
लढाया होतात सिध्द

ठेच खाल्लेले हवेत रे
नसो कार्यकर्तेप्रसिद्ध
मध्ये नको खचायला
शेवटपर्यंत हवी जिद्द

मागण्यामांडतअसता
ओळखे दात्याची हद्द
किंमतत्याची अमुल्य
जे मिळते कष्ट साध्य

लालचं दाखवती कैक
करते आपणांस विध्द
बहकवू पाही सिमेवर
स्वार्थांचे पाजती मद्य

मिडीया सतत घोटाळे
चमचमीत लाभे खाद्य
घोटाळे करु पाहतात
वाजवूनि आपले वाद्य

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# महिला, मुलींवरील अत्याचार रोखण्यासाठी छत्रपती शिवरायांचा कायदा हवा

सद्या देशांमध्ये महिलांवर, मुलींवर लैंगिक छळाच्या घटनांमध्ये वाढचं होताना दिसत आहे. आजच्या घडीला सरकार अशा घटनांचा बीमोड करण्यासाठी हरतऱ्हणे प्रयत्न करत आहे. पण त्याला आजूनही यश आल्याचे दिसून येत नाही, जेवढे कायदे कडक आहेत तेवढ्या पळवाटाही आहेत. तसेच कायद्यांची अंमलबजावणी काटेकोरपणे होताना दिसत नाही. महिला अथवा मुलींच्यावर जे अत्याचार करणारे किंवा यासारख्या घटनेतील गुन्हेगार आहेत ते या गुन्ह्यांमधून सहीसलामत सुटून उजळ माथ्याने समाजामध्ये फिरतात. त्यामुळे पुन्हा त्यांना असे गुन्हे करण्यास वाव मिळतो, गुन्हेगारांना कायद्यांची भीतीचं उरलेली नाही लैंगिक अत्याचारांच्या घटनांमध्ये महिला अथवा मुली आपले नांव बदनाम होईल, इज्जत जाईल या भितीपोटी घडलेला प्रकार घरच्यांना किंवा पोलिसांना सांगण्याच्या भानगडीत पडत नाहीत. त्यामुळेच अशा गुन्हेगारांचे फावते आज अनेक प्रकारे महिलांना, मुलींना आमिष दाखवणे, बळजबरी करणे, धमकावणे, फसविणे, गुंगीचे पदार्थ देवून मोबाईलवर चित्रफित बनवून सार्वजनिक अर्थात व्हायरल करणे अशा प्रकारे भिति घालून अत्याचार, लैंगिक छळ केला जातो. ज्यावेळी घटना घडते त्यावेळीच त्याची जास्त चर्चा होताना दिसते काही कारवाया होतात. नंतर ती घटना माघारी पडते, लोक विसरुन जातात तोपर्यंत दुसरी घटना कानी पडते हे असेच किती दिवस चालणार ? असा सवाल उपस्थित होत आहे. महिलां असो अगर मुलींवर अत्याचार करणाऱ्या गुन्हेगारांना जरब बसवण्यासाठी छत्रपती शिवरायांचा कायदा अंम लात आणावा जसे रांजाच्या पाटलाचे हातपाय छाटून त्याचा चौरंग केला. तसा कायदा असावा ही एकच शिक्षा योग्य वाटते पुन्हा असे करण्यास गुन्हेगार वळणार नाहीत आणि अशा घटनांना आळा बसण्यास मदत होईल.

**– राजू जाधव,**
**मांगूर जि.बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



## थोडक्यात बातम्या

# अंगावर वीज कोसळून युवकांचा जागीच मृत्यू



**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.३०,चिमूर (चंद्रपूर) :** मुसळधार पावसाच्या संभाव्य धोक्यामुळे गुरुवार, दि.३० जुलै २०२६ रोजी शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली होती. त्यामुळे घरची गाय चारण्यासाठी शेतात गेलेल्या चिमूर तालुक्यातील गदगाव येथील महाविद्यालयीन विद्यार्थी सुहास जयेंद्रथ काळे (वय १९) याचा अंगावर वीज कोसळून जागीच मृत्यू झाला. या घटनेने गदगावसह परिसरात शोककळा पसरली आहे.

सुहास काळे हा चिमूर येथील ग्रामगीता महाविद्यालयात प्रथम बी.ए. वर्षात शिक्षण घेत होता. दि.३० जुलै २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता तो स्वतःच्या शेतात गाय चारण्यासाठी गेला होता. दुपारी पाऊस सुरू झाल्याने तो बचावासाठी झाडाखाली उभा होता. त्याचवेळी गावापासून सुमारे दोन किलोमीटर अंतरावरील शेतात अचानक वीज कोसळली. विजेचा तीव्र फटका बसल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. या दुर्दैवी घटनेमुळे काळे कुटुंबावर दुःखा चा डोंगर कोसळला असून, गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# श्री ढोकेश्वर महाविद्यालयात 'बीसीए' अभ्यासक्रमाला मान्यता
## ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आयटी शिक्षणाचे नवे दालन खुले



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आनंदाची बातमी आहे. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित श्री ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून (बीसीए) बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स या पदवी अभ्यासक्रमास मान्यता प्राप्त झाली आहे.

आजच्या डिजिटल युगात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात प्रचंड रोजगाराच्या संधी आहेत. मात्र ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार खढ शिक्षणासाठी शहराकडे धाव घ्यावी लागत होती. ही अडचण आता दूर होणार आहे. या मान्यतेमुळे परिसरातील विद्यार्थ्यांना आपल्याच गावात आधुनिक तंत्रशिक्षण घेता येणार आहे. बीसीए अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना प्रोग्रामिंग, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, वेब डिझाईन, डेटाबेस मॅनेजमेंट, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर सुरक्षा यांसारख्या उद्योगाभिमुख विषयांचे सखोल ज्ञान दिले जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना नोकरीबरोबरच स्टार्टअप आणि उद्योजकतेसाठीही वाव मिळणार आहे. ही मान्यता मिळवून देण्यासाठी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्रजी दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव मुकेशदादा मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे आणि ज्येष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले. या मान्यतेबद्दल समाधान व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व रोजगाराभिमुख शिक्षण देणे हे आमचे ध्येय आहे. इउअ हा अभ्यासक्रम त्या दिशेने टाकले महत्त्वाचे पाऊल आहे. महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांनी या निर्णयाचे स्वागत करून संस्थेचे अभिनंदन केले आहे. प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरू होणार असून इच्छुक विद्यार्थ्यांनी महाविद्यालय कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्यांनी केले आहे.

# जीवन धारा च्या वतीने आझाद पब्लिक स्कूलमध्ये व्यसनमुक्ती जनजागृती सत्र संपन्न




**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.३०, गोवंडी (मुं.उपनगर) :** महाराष्ट्र शासनाच्या व्यसनमुक्ती अभियानांतर्गत जीवन धारा संस्थेच्या वतीने दिनांक ३० जुलै २०२६ रोजी चिता कॅम्प येथील आझाद पब्लिक स्कूलयेथे विद्यार्थ्यांसाठी व्यसनमुक्ती जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्रात अनके विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. सत्राचे मार्गदर्शन लॉरेन्स सर यांनी केले. या सत्राचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये व्यसनाच्या दुष्परिणामांविषयी जागरूकता निर्माण करणे हा होता. मार्गदर्शन करताना लॉरेन्स सर यांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनामुळे व्यक्तीच्या जीवनावर होणाऱ्या गंभीर परिणामांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी विशेषतः तीन महत्त्वाच्या बाबींवर भर दिला. व्यसनाचा पहिला परिणाम थेट शारीरिक आरोग्यावर होतो, ज्यामुळे विविध आजार आणि आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. दुसरा परिणाममानसिकतेवरहोऊन व्यक्तीच्या विचारशक्ती, निर्णयक्षमता आणि वर्तनावर विपरीत परिणाम होतो. तिसरा परिणाम व्यक्तीच्या श्रद्धा, प्रामाणिकपणा आणि नैतिक मूल्यांवर होतो. ज्यामुळे सामाजिक व वैयक्तिक जीवनात अनेक अडचणी निर्माण होतात.

यावेळी त्यांनी व्यसनामुळे व्यक्तीचे कौटुंबिक, सामाजिक आणि वैयक्तिक आयुष्य कसे प्रभावित होते. याबाबत उदाहरणांसह मार्गदर्शन केले. तसेच व्यसनाच्या वाढत्या प्रमाणामुळे दरवर्षी मोठ्या संख्येने लोक मृत्युमुखी पडतात, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी सत्रात उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले व व्यसनमुक्त जीवन जगण्याचा संकल्प व्यक्त केला. जीवन धारा संस्थेच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला असून अशा जनजागृतीपर कार्यक्रमांची समाजात सातत्याने आवश्यकता असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. आवश्यक असल्यास ही बातमी वृत्तपत्र शैलीत छोट्या किंवा अधिक औपचारिक स्वरूपात ही तयार करून देऊ शकतो.

# महाबळेश्वर - तापोळा मार्गावरील फळणे वस्तीजवळील खचलेला रस्ता अवघ्या चार दिवसांत पूर्ववत
## युद्धपातळीवर दुरुस्ती; तापोळा खोऱ्यातील १०५ गावांचा संपर्क पुन्हा सुरू; नागरिक व पर्यटकांना मोठा दिलासा



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.३०, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर आणि तापोळा या प्रमुख पर्यटनस्थळांना जोडणाऱ्या तसेच तापोळा खोऱ्यातील १०५ गावांसाठी जीवनवाहिनी ठरणाऱ्या महाबळेश्वर-तापोळा मार्गावरील फळणे वस्तीजवळ मुसळधार पावसामुळे खचलेला रस्ता अवघ्या चार दिवसांत युद्धपातळीवर दुरुस्त करण्यात आला आहे. नगरपरिषद प्रशासन, महसूल विभाग आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून रात्रंदिवस सुरू असलेल्या कामामुळे या मार्गावरील वाहतूक पुन्हा सुरळीत झाली असून नागरिक, शालेय विद्यार्थी, शेतकरी आणि पर्यटकांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या काही दिवसांतील अतिवृष्टीमुळे रस्त्याखालील माती व भराव वाहून गेल्याने रस्त्याचा मोठा भाग खचला होता. त्यामुळे एसटी बस, दूध व भाजीपाल्याची वाहतूक तसेच दैनंदिन प्रवास पूर्णपणे विस्कळीत झाला होता. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तात्काळ वाहतूक बंद करून दुरुस्तीचे काम हाती घेतले.

या कामासाठी सुमारे ५० ब्रास दगड, २० ब्रास खडी आणि २० ब्रास मुरूम वापरण्यात आला. पोकलेन, जेसीबी आणि टिपरच्या सहाय्याने नगर अभियंता मुरलीधर धायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली १५ ते २० कर्मचाऱ्यांचे पथक सलग चार दिवस कार्यरत होते. दगड व मुरूमाचा मजबूत भराव टाकून त्यावर खडी दाबण्यात आली आणि रस्ता सुरक्षित व वाहतुकी योग्य करण्यात आला.

मुख्याधिकारी योगेश पाटील म्हणाले, रस्ता खचल्याची माहिती मिळताच नगरपरिषदेने तात्काळ यंत्रसामग्रीसह काम सुरू केले. चार दिवसांच्या अथक परिश्रमानंतर रस्ता पुन्हा सुरू करण्यात आला. नागरिक, विद्यार्थी आणि पर्यटकांची सुरक्षितता हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे.

स्थानिक नागरिकांनीही प्रशासनाच्या तत्परतेचे कौतुक करत सांगितले की, रस्ता बंद झाल्याने दूध, भाजीपाला आणि इतर अत्यावश्यक वाहतुकीचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. अवघ्या चार दिवसांत रस्ता पूर्ववत झाल्याने परिसराला मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील यांनी नगराध्यक्ष सुनील शिंदे व मुख्याधिकारी योगेश पाटील यांना रस्ता तातडीने सुरू करण्याच्या सूचना दिल्यानंतर दुरुस्तीच्या कामाला अधिक वेग देण्यात आला.

कामाची पाहणी करण्यासाठी जिल्हा बँक संचालक राजेंद्र राजपुरे, नगरसेवक अफझल सुतार, संतोष शिंदे, संजय जंगम, रोहित ढेबे, जिल्हा परिषद सदस्य अजित संकपाळ तसेच पंचायत समिती उपसभापती संजय मोरे यांनी भेट देऊन समाधान व्यक्त केले.

नगर अभियंता मुरलीधर धायगुडे, बांधकाम मुकादम संदीप पवार, सुनील केळगणे, मारुती साळुंखे आणि नगरपरिषदेच्या बांधकाम विभागातील कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेऊन हे काम यशस्वीपणे पूर्ण केले. त्यांच्या या कार्याचे परिसरातून सर्वत्र कौतुक होत आहे.

दरम्यान, रस्ता वाहतुकीसाठी खुला झाला असला तरी पावसाळ्यात डोंगराळ भागातून प्रवास करताना वाहनचालकांनी वेगावर नियंत्रण ठेवून वळणांवर विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाने केले आहे.

# दिव्यात मनसेकडून रस्त्यांवरील खड्ड्यांची 'शांती' करत उपहासात्मक आंदोलन



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३०, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्ड्यांच्या निषेधार्थ महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या दिवा शहर शाखेतर्फे गुरुवार, दि.३० जुलै २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक, दिवा (पूर्व) येथे खड्ड्यांची शांती हा उपहासात्मक आंदोलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

दिवा शहरातील जवळपास सर्वच प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्यामुळे वाहनचालक, पादचारी तसेच सर्वसामान्य नागरिकांना रोज मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. मात्र, या गंभीर समस्येकडे ठाणे महानगरपालिका प्रशासन सातत्याने दुर्लक्ष करत असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला.

महापालिका प्रशासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधण्यासाठी आणि तातडीने खड्डे दुरुस्तीची कामे हाती घेण्यात यावीत, या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात खड्ड्यांची पूजा करून त्यांना सर्वसामान्य जनतेला त्रास देऊ नका अशी विनंती करण्यात आली.

### ठा.म.पा.च्या भ्रष्टाचाराचा पर्दाफाश

यावेळी मनसे पदाधिकाऱ्यांनी रस्त्यांच्या कामातील भ्रष्टाचार उघड केला.

दिवा - शीळ रस्त्याच्या डांबरीकरणासाठी २०१९ मध्ये ₹१६.८६ कोटींची निविदा काढण्यात आली होती. त्यानंतर २०२ मध्ये या कामासाठी आणखी ₹३ कोटींची वाढीव तरतूद करण्यात आली. डिसेंबर २०२४ मध्ये कार्यकारी अभियंता दीपक माने यांनी या डांबरीकरणाच्या कामाला डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली. मात्र, त्याच काळात ऑक्टोबर २०२४ मध्ये याच रस्त्याच्या काँक्रीटीकरणासाठी ₹६२.६५ कोटींची स्वतंत्र निविदा काढण्यात आली. काँक्रीटीकरणाची निविदा अस्तित्वात असतानाही डांबरीकरणाचे काम सुरू ठेवून १० टक्के काम पूर्ण झाल्याचे दाखवत सुमारे ₹२० कोटींची बिले काढण्यात आली. हा एक गंभीर आर्थिक घोटाळा असून त्याची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करायला हवी. असे दिवा शहर अध्यक्ष प्रशांत प्रभाकर गावडे यांनी आपले मत मांडले.

दिवा-शीळ रस्त्यावरील खड्ड्यांसाठी महापालिका प्रशासन नेहमी शेतकऱ्यांचा विरोध हे कारण पुढे करते. मात्र, गेली १५ ते २० वर्षे जागा देणाऱ्या शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळालेला नसताना त्यांनाच दोष देण्यात कोणताही अर्थ नाही. शेतकऱ्यांना तातडीने योग्य मोबदला देऊन दिवा-शीळ रस्त्याचा प्रश्न कायम स्वरूपी मार्गी लावावा. या मागणीसाठी मनसेचे शिष्टमंडळ लवकरच इन्फ्रामॅन खासदार यांची भेट घेणार आहे. असे जिल्हा संघटक तुषार पाटील यांनी भ्रष्टाचार उघड केला.

या आंदोलनात दिवा मनसेचे जिल्हा संघटक तुषार पाटील, विधानसभा सचिव शरद पाटील, शहर अध्यक्ष प्रशांत गावडे, महिला शहर अध्यक्ष अंकिता कदम, शहर सचिव परेश पाटील, उपशहर अध्यक्ष देवेंद्र भगत, किरण दळवी, प्रकाश पाटील, नम्रता खराडे, विभाग अध्यक्ष देवदत्त घाडी, शैलेंद्र कदम, जयेश घरत यांच्यासह इतर पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# नवीन बिना बौद्ध विहारात वर्षावासाची सुरवात



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३०, नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन बिना बौद्ध विहारात आषाढ पौर्णिमा अर्थात गुरु पौर्णिमेपासून वर्षावासाची सुरवात झाली. सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या छायाचित्राला माल्यार्पण व पुष्पांजली अर्पण करून व बुद्ध वंदना घेवून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.

भारतीय बौद्ध महासभा नवीन बिना अध्यक्ष प्रा.डॉ.जितेंद्र सावजी तागडे यांनी वर्षावासाच्या इतिहासावर प्रकाश टाकतांना सारनाथला जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट केल्याबद्दल सर्वांना आनंद व्यक्त केला व सर्वांना बुद्धांचा मार्गावर चालत वर्षावास काळात संयमित जीवन जगण्याचा सल्ला देतांना वर्षावास काळात घेण्यात येणार्या उपक्रमांची माहिती दिली. यावेळी महिलांनी विविध बुद्ध गीतेही सादर केलीत.

कार्यक्रमाची सांगता खीरदान करून करण्यात आली. याप्रसंगी सल्लागार समितीचे कृष्णाजी वासनिक, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळाच्या कांता बागडे, निर्मला चिमनकर, अंजना मेश्राम, प्रभा लोखंडे, वच्छला गणविर, बेबी वासनिक, सत्यफुला कांबळे, राधिका उके, मिना मेश्राम, सत्यभामा वसनिक, कांता गोलाईत, नंदा सोमकुंवर, रेखा लांजेवार, मिना नरेश ढोके, सारिका तागडे, कल्पना वासनिक, प्रीती गोलाईत, रोहिणी धनवटे, सुनंदा लांजेवार, प्रिया डोगरे, मनीषा ढोके, प्रणया गोलाईत, साजिता तागडे व गावातील नागरिक उपस्थित होते.

# उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण, अन्नदान उपक्रम




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, भद्रावती (चंद्रपूर) :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त भद्रावती-वरोरा विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. तसेच भद्रावती तालुकाप्रमुखनरेश काळे यांच्या पुढाकाराने अंध विद्यालयातील विद्यार्थ्यांना अन्नदान करून वाढदिवस सेवाभावी पद्धतीने साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) चंद्रपूर जिल्हाप्रमुख भास्कर (भाऊ) ताजणे उपस्थित होते.

यावेळी उपजिल्हाप्रमुख अमित निब्रड, विधानसभा प्रमुख बंडू डाखरे, महिला आघाडी संघटिका भावना खोब्रागडे, माजी नगराध्यक्ष ज्ञानेश्वर डुकरे, तालुकाप्रमुख नरेश काळे, तालुका संघटक सचिन डुकरे, आशिष रणदिवे, पुरुषोत्तम नैताम शहर समन्वयक, उपतालुकाप्रमुख गोलू गेडाम, उपतालुकाप्रमुख प्रवीण आवारी, सुनील चौधरी, शहरप्रमुख अतुल नांदे, सागर भेले, कैलास दुधकोहडे, गोपाल बोंडे, विलास थेरे, धनराज गानफाडे, दिलीप राऊत, विजय मत्ते, विनोद येसेकर, किसान येरगुडे, बावने, पद्माकर बोधाने, सुनील राऊत, नागनाथ नेहरे तसेच असंख्य शिवसैनिक आणि अंध विद्यालयातील शिक्षकवृंद उपस्थित होते. समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून उद्धवसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला तसेच गरजू विद्यार्थ्यांसोबत अन्नदानाचा उपक्रम राबवून सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव जपण्यात आली. उपस्थितांनी उद्धवसाहेबांना दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि यशस्वी सार्वजनिक जीवनासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण, सेवाभावी आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

# सार्वजनिक वाचनालयाचा शुभारंभ मोबाईलच्या युगात वाचन संस्कृती जपण्याचा स्तुत्य उपक्रम

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.३०, माथेरान :** गुरु पौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर इंदिरानगर येथील श्री गणेश मंदिरात सार्वजनिक वाचनालयाचा शुभारंभ उत्साहात संपन्न झाला. नगरसेवक केतन रमेश रामाणे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थी, युवक आणि नागरिकांमध्ये वाचन संस्कृतीला चालना मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे उद्घाटन गुरुवर्य शिक्षक वर्ग जयश्री सावंत, सुनील कदम, विदुला गोसावी आणि लक्ष्मण ढेबे यांच्या हस्ते झाले. यावेळी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, नगरसेवक मनोज खेडकर, गटनेते शिवाजी शिंदे, शिक्षण सभापती सुनील शिंदे, गट नेते शिवाजी शिंदे विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार, सोहेल महापुळे, नगरसेविका रिजवाना शेख, ऐश्वर्या शिंदे, गायकवाड सामाजिक कार्यकर्ते नितीन शहा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विविध पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले.

प्रास्ताविकात नगरसेवक केतन रामाणे यांनी मोबाईल आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे पुस्तक वाचनाची सवय कमी होत असल्याची खंत व्यक्त करत, विद्यार्थी व नागरिकांनी नियमित वाचन करून ज्ञानचळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

मनोज खेडकर यांनी यशस्वी होण्यासाठी वाचन आवश्यक आहे. आपण स्वतः पुस्तके वाचली तरच मुलांमध्ये वाचनाची सवय निर्माण होईल. स्वतःमध्ये बदल घडवा, पुस्तक वाचन जीवन समृद्ध करते, असे सांगितले. जयश्री सावंत यांनी तरुण पिढी ज्ञानाचा ठेवा विसरत चालल्याची खंत व्यक्त केली. सुनील कदम यांनी विक्रांत मंडळाच्या माध्यमातून गेली ४६ वर्षे विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून, विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढविण्यासाठी वाचनालयाचा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याचे सांगितले.



विदुला गोसावी, रिजवाना शेख, शिवाजी शिंदे, सुनील शिंदे आणि सीताराम कुंभार यांनीही वाचनाचे महत्त्व अधोरेखित करत, लोकशाही, स्वाभिमान, विचारशक्ती आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी पुस्तक वाचन आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमात नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी वाचनालयासाठी कपाट व खुर्च्यांसाठी ₹१ लाखांची तरतूद करण्याची घोषणा केली. तसेच वैयक्तिक ₹१,०००० देणगी जाहीर केली. शिवाजी शिंदे यांनी ₹५,००० देणगी जाहीर केली, तर मनोज खेडकर यांनी स्वतःच्या संग्रहातील पुस्तके वाचनालयाला भेट दिली. सामाजिक कार्यकर्ते नितीन शहा यांनीही पुस्तकांसाठी आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन दिले.

या वाचनालयात स्पर्धा परीक्षा, साहित्य, इतिहास, विज्ञान, चरित्रे, कादंबऱ्या आणि विविध ज्ञानवर्धक पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. कार्यक्रमास आदेश घाग, अमर शिंदे, राजेंद्र मोरे, अशोक कदम, स्वप्नील गोसावी, सुरेश शिंदे, ललित पांगसे, अर्पिता शिंदे, अनुजा घाग, विद्या शिंदे, कनिष्का रामाणे पुष्पा कदम अंकिता मोरे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वनकुटेच्या रखडलेल्या घर नुकसानभरपाईचा 3 वर्षांनंतर मार्ग मोकळा

## आ.दातेंच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश; मंत्र्यांचे अधिकाऱ्यांना तातडीने कारवाईचे आदेश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** एप्रिल २०२३ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे पारनेर तालुक्यातील वनकुटे गावातील अनेक घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. तब्बल तीन वर्षे उलटूनही शासकीय अनुदान रखडले होते. अखेर आमदार काशिनाथ दाते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या रखडलेल्या नुकसान भरपाईचा मार्ग मोकळा झाला आहे. वनकुटे गावच्या सरपंच व ग्रामस्थांच्या माध्यमातून वारंवार होत असलेल्या मागणीचा विचार करून. आमदार दाते यांनी मदत व पुनर्वसन मंत्री नामदार मकरंद आबा पाटील यांच्यासमोर वनकुटे गावातील प्रलंबित अनुदानाचा हा मुद्दा ठामपणे मांडलेला होता व त्यानंतर मागील महिन्यात वनकुटे ग्रामपंचायतीने नुकसानभरपाई मिळवून देण्याबाबतचे लेखी निवेदन आमदार दातेंकडे सादर केल्यानंतरही त्यांनी ह्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी संबंधित ग्रामस्थांना तातडीने न्याय देण्याची मागणी केली. अवकाळीच्या वेळी तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वनकुटे गावाला भेट देत नुकसानग्रस्तांना मदतीचे आश्वासन दिले होते. मात्र त्यानंतरही अनुदान मिळाले नाही. या गंभीर प्रश्नावर आमदार दाते यांनी पारनेर व कान्हुरपठार मंडळातील नुकसानग्रस्तांच्या बैठक मंत्री आबा पाटील यांच्यासमोर हा मुद्दा ठामपणे मांडला. मागील महिन्यात वनकुटे ग्राम पंचायतीने दिलेल्या लेखी निवेदनानंतर ही आ. दाते यांनी ग्रामस्थांना तातडीने न्याय देण्याची मागणी लावून धरली.



आमदार काशिनाथ दाते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर एप्रिल २०२३ मधील अवकाळी पावसाने बाधित घरांच्या अनुदानाचा मार्ग मोकळा झाला आहे. यासाठी मंत्री नामदार मकरंद आबा पाटील यांनी प्रशासनाला कार्यवाहीचे स्पष्ट निर्देश दिले. वनकुटे ग्रामस्थांच्या वतीने आमदार काशिनाथ दाते सरांचे मनःपूर्वक आभार. वनकुटे ग्रामस्थ सदैव आपले ऋणी राहतील,

**- सुमन रांधवण (सरपंच, वनकुटे)**

आमदार काशिनाथ दाते यांच्या सातत्यपूर्ण व प्रभावी पाठपुराव्यामुळे वनकुटे येथील नुकसानग्रस्तांना अनुदान मिळण्याबाबत तातडीने प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

# अहिल्यानगर लोहार समाजाला नवा कर्णधार

## भास्कर पोपळघट यांची जिल्हाध्यक्ष पदी बिनविरोध निवड



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** अखिल लोहार समाज विकास संस्था महाराष्ट्र राज्य प्रतिनिधी समितीची महत्त्वाची बैठक नुकतीच पुणे येथे संस्थेचे राज्याचे अध्यक्ष संदिप थोरात यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली यावेळी अहिल्यानगर लोहार समाज संघटनेच्या अध्यक्षपदी पत्रकार भास्कर पोपळघट यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली.

या प्रसंगी राज्य संघाचे उपाध्यक्ष विश्वनाथ लोखंडे, सचिव डॉ.मुकुंद लोखंडे, मनोज थोरात, खजीनदार निवृत्ती पोपळघट, संघटनेचे पुणे जिल्हाध्यक्ष भरत थोरात संस्थापक सदस्य नवनाथ हाराळे, बाळासाहेब इघे, सुभेदार किसनराव पखाले, उद्योजक बाळासाहेब चव्हान, किसनराव लोखंडे, दत्ताभाऊ जगताप, विजयकुमार जगताप , गुलाब चव्हान, संघाच्या प्रसिध्दी प्रमुख रोहिणीताई हराळे, यांचे सह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते

यावेळी बोलतांना संघाचे राज्याचे अध्यक्ष थोरात यांनी सांगितले की संपुर्ण राज्यात लोहार समाजाची आवस्था आत्यंत हालाकीची झाली असून समाजातील तरुणांचा मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल आहे शासनाचे विवीध उपक्रम समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असून विविध मागण्या शासन दरबारी मांडत आहोत अहिल्यानगर जिल्हात भास्कर पोपळघट यांच्या माध्यमातून संघटरेचा विस्तार करून जिल्हा कार्यकारणी जाहीर करून प्रत्येक तालुक्यात संघटनेची बांधणी करून जिल्हातील तरुणांना एकत्र करून अहिल्यानगर जिल्हाची संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.

महाराष्ट्र शासनाने लोहार समाजाची सामाजिक व आर्थिक स्थिती मजबूत होण्यासाठी ब्रम्हलीन आचार्य दिव्यानंद महाराज या आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली समाजातील सुशिक्षित तरुणांना उद्योग सुरू करण्यासाठी कर्ज मिळणार म्हणून तरुणांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या परंतु बँकेच्या विवीध शर्ती अटींमुळे कर्ज मिळत नाही त्यामुळे या महामंडळाचा काहीच फायदा समाज्यातील तरुणांना होतांना दिसत नाही त्यामुळे अहिल्यानगर जिल्हात लोहार समाज्याच्या उन्नतीसाठी शासन दरबारी प्रयत्न करून सुपा एम आय डी मध्ये जागेची मागणी करून तरुणांच्या हताला काम मिळ्यासाठी एकत्रीत पद्धतीने विश्वकर्मा औद्योगिक सोसायटी स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणार तर तालुका निहाय कमीटी स्थापन करून तरुणांसाठी विशेष काम करणार

**– भास्कर पोपळघट (अध्यक्ष, अहिल्यानगर जिल्हा लोहार समाज संघटना)**

---

अहिल्यानगर जिल्ह्यात सन २००२ साली तात्कालिन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत व समाजाचे नेते स्वर्गिय साथी हौशिनाथ पोपळघट यांच्या पुढाकाराने राज्य स्थरीय अधिवेशन झाले विवीध मागन्या मंजूर झाल्या जातीला छ.ढ.इ या प्रवर्गात समाविष्ट करण्यात आले त्यामुळे अनेक विद्यार्थीना फायदा झाला परंतु त्यानंतर मात्र संघटनेला सुस्त आवस्था आली गेल्या काही वर्षांत तिळवणतेली कुंभार, चांभार, सोनार, न्हावी, सुतार, व बलुतेदार समाजातील अनेक समाज्याचे सुसज्य समाजभवन आहेत परंतु असंघटीत असलेल्या लोहार समाज मात्र या बाबत पाठपुरावा करण्यासाठी कमी पडला आहे परंतु पुढील काळात जिल्हाच्या ठीकनी समाज भवन उभारणीसाठी प्रयत्न करणार

**– नवनाथ हराळे (कार्याध्यक्ष लोहार समाज विकास संस्था महाराष्ट्र)**

# पाटण रोडवरील खडीच्या ढिगामुळे वाहतुकीला अडथळा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, उंब्रज (सातारा) :** कराड तालुक्यातील उंब्रज येथून पाटणकडे जाणाऱ्या राज्यमार्गावर उंब्रज हद्दीत रस्त्याच्या साईड पट्टीवर मोठ्या प्रमाणात मातीमिश्रित खडीचा ढीग टाकण्यात आल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झाला असून गंभीर अपघाताची शक्यता वाढली आहे. या धोकादायक परिस्थितीमुळे वाहनचालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. सदर मार्गावर दिवसभर एसटी बस, शालेय



वाहने, दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मात्र रस्त्यालगतच खडीचा मोठा ढीग टाकल्यामुळे वाहनांना बाजूने जाताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः समोरून वाहन आल्यास चालकांना वाहन नियंत्रित करणे कठीण होत असून अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. रात्रीच्या वेळी प्रकाशाची अपुरी व्यवस्था असल्यामुळे या ढिगाचा अंदाज वेळेत येत नाही. त्यामुळे दुचाकीस्वार घसरून पडणे किंवा चारचाकी वाहनांचा तोल जाऊन गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पावसाळ्यात तर या ठिकाणी आणखी धोका वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने या ठिकाणी टाकण्यात आलेला खडीचा ढीग तात्काळ हटवून वाहतुकीचा मार्ग सुरक्षित करावा, अशी जोरदार मागणी प्रवासी, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांकडून होत आहे. अपघात झाल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा वेळेत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## थोडक्यात बातम्या

# परभणी जिल्ह्यावर वरुणराजाची जोरदार कृपा मुसळधार पावसाने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.३०, परभणी :** परभणी जिल्ह्यात गुरुवारी दुपारनंतर वरुणराजाने दमदार हजेरी लावत अनेक तालुक्यांमध्ये मुसळधार पाऊस कोसळला. गेल्या काही दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यातील जिंतूर, परभणी, सेलू, पाथरी, मानवत, गंगाखेड, पूर्णा, पालम आणि सोनपेठ परिसरात पावसाची संतोषजनक नोंद झाली. खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका आदी पिकांना या पावसाचा मोठा फायदा होणार असून शेतांमध्ये पुन्हा नवसंजीवनी निर्माण झाली आहे. पावसाअभावी चिंतेत असलेले शेतकरी आता दिलासा व्यक्त करत असून पिकांची वाढ जोमाने होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.मुसळधार पावसामुळे शेतातील ओलावा वाढला असून विहिरी, शेततळी आणि लहान नाल्यांमध्येही पाण्याची आवक सुरू झाली आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतुकीवर काही प्रमाणात परिणाम झाला. शहरांसह ग्रामीण भागातही पावसाने वातावरण आल्हाददायक झाले असून उष्णतेपासून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.शेतकऱ्यांनी या पावसाचे स्वागत करत, हा पाऊस खरीप हंगामासाठी जीवनदायी ठरेल, अशी भावना व्यक्त केली. कृषी क्षेत्रासाठी हा पाऊस अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून पुढील काही दिवसही अशीच पावसाची साथ मिळाल्यास यंदाच्या खरीप हंगामाला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे.एकीकडे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत असताना, दुसरीकडे प्रशासनाने नागरिकांना अतिवृष्टीच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. एकूणच, परभणी जिल्ह्यावर झालेल्या या दमदार पावसामुळे संपूर्ण जिल्ह्यात समाधान आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे

# शेतकरी सक्षमीकरणाचा राष्ट्रीय गौरव; सुमन तांबारे यांना ‘प्राईड ऑफ भारत’ पुरस्कार




**अक्षराज : अर्जुन कवडे**

**दि.३०, येरमाळा :** शेतकरी सक्षमीकरण, आधुनिक शेतीचा प्रसार आणि ग्रामीण विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत येडाई फार्मर प्रोड्युसर कंपनी (एफपीओ), आंदोरा (ता. कळंब) चे चेअरमन सुमन माणिकराव तांबारे यांना प्रतिष्ठेचा ‘प्राईड ऑफ भारत’ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय (MSME) आणि अचिव्हर्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवी दिल्ली येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात श्री. तांबारे यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. येडाई एफपीओच्या माध्यमातून शेतकरी सक्षमीकरण, आधुनिक शेतीचा प्रसार आणि ग्रामीण विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला. या सन्मानाबद्दल विविध स्तरांतून श्री. तांबारे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.३०, शिरपूर :** शिरपूर तालुक्यातील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालय, भोरखेडा येथे विद्यालयाचे प्राचार्य सी. एन. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुरु पौर्णिमा उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात एकूण ३० विद्यार्थ्यांनी स्वरचित कवितांचे सादरीकरण करून गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांचा पुष्पगुच्छ व शुभेच्छा देऊन सन्मान केला. स्वरचित कविता स्पर्धेतील उत्कृष्ट कवींचा गौरव करण्यात आला. लहान गटात प्रथम क्रमांक स्नेहा प्रदीप देवरे, द्वितीय मोक्षदा पुरुषोत्तम देवरे आणि तृतीय नैनेश लालसिंग गिरासे यांनी मिळविला. तर मोठ्या गटात प्रथम गुंजन उदयम श्रीराव, द्वितीय पियुषा प्रदीप देवरे आणि तृतीय मीनल वाल्मिक पाटील यांनी यश संपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यवेक्षक एस. डी. पाटील हे होते. यावेळी अनिल खुटे यांनी गुरु पौर्णिमेचे महत्त्व विशद करून विद्यार्थ्यांना गुरुंचा आदर व ज्ञानाचे मूल्य याविषयी मार्गदर्शन केले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून जी. के. राऊळ यांनी काम पाहिले, तर कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन एम. जी. वाडीले यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य व परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# गुरुपौर्णिमेनिमित्त श्री संत गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण व महाप्रसाद संपन्न



**अक्षराज : भुषण बावचीकर**

**दि.३०, वाघोली (पुणे) :** श्री संत गजानन महाराज चॅरिटेबल ट्रस्ट, वाघोली (पुणे) यांच्या वतीने गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथाच्या सामूहिक वाचनाचा भव्य धार्मिक सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला परिसरातील भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

कार्यक्रमाची सुरुवात दि.२९ जुलै ला सकाळी श्री सत्यनारायण महापूजेने झाली. त्यानंतर श्री संत गजानन महाराजांची महाआरती करण्यात आली. सकाळी ११ वाजता श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथाच्या सामूहिक वाचनास प्रारंभ झाला. दिवसभर भाविकांनी श्रद्धा, भक्ती आणि एकाग्रतेने ग्रंथ वाचनात सहभाग घेतला. उपस्थित भाविकांसाठी दुपारी चहा व फराळाची तसेच संध्याकाळी महाआरतीनंतर महाप्रसाद व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली. समारोपप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष श्री शेखर देसाई यांनी उपस्थित भाविकांना संबोधित करताना सांगितले की, गेल्या पाच ते सहा वर्षांपासून श्री संत गजानन महाराजांच्या कृपेने गुरुपौर्णिमेनिमित्त श्री संत गजानन विजय ग्रंथाच्या सामूहिक वाचनाची परंपरा अखंडपणे सुरू असून, दरवर्षी भाविकांचा वाढता प्रतिसाद आणि सहभाग हीच या उपक्रमाची खरी प्रेरणा आहे. पुढील काळातही ही धार्मिक व समाजप्रबोधनाची परंपरा अधिक व्यापक स्वरूपात सुरू ठेवण्याचा ट्रस्टचा संकल्प असल्याचे त्यांनी नमूद केले.